CMYK

दैनिक

# आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ दैनिक ■धाराशिव ■वर्ष 2 रे ■ अंक 109■ गुरूवार दि.29 मे 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04■ किंमत रू 5

**सुविचार**

प्रश्न विचारणे ही ज्ञानाच्या शोधाची पहिली पायरी आहे.



महिला सशक्तीकरणासाठी कौशल्य प्रशिक्षण,प्रेरक सामाजिक संस्थेचा उपक्रम

पेज ४


# १० दिवसात अडीचशे मिमी पाऊस,वार्षिक सरासरीच्या एक तृतीयांश बरसला

## तेरणा प्रकल्पातील पाणीसाठा ५ तर सीना कोळेगाव प्रकल्पातील पाणीसाठा ८ टक्क्यांनी वाढला

आरंभ मराठी | धाराशिव

गेल्या दहा दिवसांपासून धाराशिव जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने घातलेला धुमाकूळ अनेक घटकांवर परिणामकारक करणारा ठरत आहे. शंभर वर्षे वय असलेले नागरिक देखील मे महिन्यात असा पाऊस कधीच बघितला नाही असे सांगत आहेत. यंदा मान्सूनपूर्व पावसाने लावलेली हजेरी अचंबित करणारी आहे. धाराशिव जिल्ह्यात वार्षिक ६०० ते ७०० मिमी पाऊस पडतो. परंतु, मागील दहा दिवसांत पडलेल्या पावसाची सरासरी २५० मिमी आहे. म्हणजे वार्षिक सरासरीच्या एक तृतीयांश पाऊस मे महिन्याच्या दहा दिवसांत पडला आहे. या पावसाने जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या सीना कोळेगाव धरणात ८ टक्के पाणीसाठा वाढला आहे तर तेरणा मध्यम प्रकल्पात ५ टक्के पाणीसाठा वाढला आहे.

अद्याप मे महिना संपण्यासाठी तीन दिवस शिल्लक असताना अचानक पावसाच्या निमित्ताने निर्माण झालेले अस्मानी संकट कधी सुटणार, याचे अंदाज बांधणे कठीण झाले आहे. ऐन वैशाखाच्या रणरणत्या उन्हामध्ये घामाच्या धारांनी बेजार झालेल्या नागरिकांना पावसाच्या धुवाँधार फटकेबाजीने गारठून जाण्याचा प्रसंग उद्भवला आहे. या पावसामुळे फळबागांसह खरिपाच्या पेरणींवरही सर्वात मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. दरवर्षी शेतकरी या दिवसात पेरणीपूर्वी मशागतीच्या कामात व्यस्त असतात यंदा मात्र पेरणीपूर्वी मशागतीसाठी जमिनीचा वाफसा कधी होतो याकडे लक्ष देऊन बसले आहेत. धाराशिव जिल्ह्यातील वार्षिक पर्जन्याची सरासरी ६०० ते ७०० मि लिमीटर इतकी आहे. मात्र दिनांक १८ मे ते २८ मे या दहा दिवसांतच धाराशिव जिल्ह्यात तब्बल २४५ मिलिमीटर इतका पाऊस पडला आहे. म्हणजे वार्षिक सरासरीच्या एक तृतीयांश पाऊस मान्सून दाखल होण्यापूर्वीच पडला आहे. या पावसाने एकीकडे फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर दुसरीकडे जिल्ह्यातील छोट्या-मोठ्या सर्व जलप्रकल्पात पाण्याचा मोठा संचय झाल्यामुळे जिल्ह्यातील पाणीटंचाईचे संकट काही प्रमाणात दूर झाले आहे.



तेरणा प्रकल्पातील जल साठ्यात वाढ झाली आहे.

### शून्यावर गेलेल्या ४० प्रकल्पात पाणी वाढले

धाराशिव जिल्ह्यातील मोठ्या, मध्यम आणि लघु अशा सर्व प्रकल्पाच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. मागील आठवड्यात जिल्ह्यातील १०५ प्रकल्पानी तळ गाठला होता म्हणजे त्यांची पाणीपातळी शून्य टक्क्यांवर गेली होती. ती संख्या कमी होऊन ६५ वर आली आहे. सध्या ६५ प्रकल्पात उपयुक्त पाणीसाठा शून्य टक्के आहे. म्हणजेच मागील आठवड्यात शून्यावर गेलेल्या ४० प्रकल्पात सध्याच्या पावसामुळे ५ टक्क्यांपर्यंत पाणी जमा झाले आहे.

### तेरणा आणि सीना कोळेगाव प्रकल्पातील पाणीसाठ्यात वाढ

दहा दिवसांच्या सततच्या पावसाने जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या सीना कोळेगाव प्रकल्पात ८ टक्के पाणीसाठा वाढला आहे. मागील आठवड्यात या धरणातील उपयुक्त पाणीसाठा शून्यावर गेला होता तो दिनांक २८ मे च्या रिपोर्टनुसार ८ टक्क्यांवर गेला आहे. तेरणा मध्यम प्रकल्पात देखील आठ दिवसात ५ टक्के पाणीसाठा वाढला आहे. मागील आठवड्यात तेरणा मध्यम प्रकल्पात ३१ टक्के उपयुक्त पाणीसाठा होता तो सध्या ३६.१३ टक्के इतका झाला आहे.

**तालुकानिहाय पडलेला पाऊस**

| तालुका | पाऊस (मिमी.) | पावसाचे दिवस |
|---|---|---|
| धाराशिव | २५१ | ११ |
| तुळजापूर | २६८ | १३ |
| परंडा | २३८ | ११ |
| भूम | २६२ | १३ |
| कळंब | २३४ | १४ |
| उमरगा | २४० | १३ |
| लोहार | २२८ | १२ |
| वाशी | २१२ | १० |
| एकूण-२४५-१२ | | |

### सर्व प्रकल्पात ३ टक्के पाणी वाढले

धाराशिव जिल्ह्यातील १ मोठा, १७ मध्यम आणि २०८ लघु अशा एकूण २२६ प्रकल्पात मागील आठवड्यात १६.६० टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता. यामध्ये वाढ होऊन उपयुक्त पाणीसाठा १८ टक्क्यांच्या पुढे गेला आहे. म्हणजे जवळपास ३ टक्क्यांची वाढ झाली आहे. मागील दोन दिवसात पडलेल्या पावसामुळे यामध्ये आणखी वाढ होईल.

## गांजाचे सेवन करून विक्री करणाऱ्या नऊ जणांवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | परंडा

गांजाचे अवैधपणे सेवन करून त्याची विक्री करणाऱ्या नऊ जणांविरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी फारूख हबीब सय्यद (वय ५२ वर्षे, रा. परंडा), बाबा भिवा शिंदे (वय ६५ वर्षे, रा. भोत्रा ता. परंडा), काशिनाथ तुकाराम नरुटे (वय ५५ वर्षे, रा. पिंपरी ता. परंडा), मुस्तफा शुकरखा पठाण (वय ४२ वर्षे, रा. सिकंदर गल्ली परंडा), सुधाकर आबासाहेब देशमुख (वय ६९ वर्षे, रा. भोत्रा ता. परंडा), जमिर गफुर सौदागर, (वय ६३ वर्षे, रा. परंडा), युसुफ पटेल (वय ५५ वर्षे, रा. आवटी ता. करमाळा जि. सोलापूर), अनिल प्रतापसिंग परदेशी (वय ५० वर्षे, रा. आसु ता. परंडा), नितीन अंबरुषी शिरसकर (वय ४२ वर्षे, रा. माळी गल्ली परंडा) हे दिनांक २७ मे रोजी दुपारी दीड वाजता सरकारी दवाखाना परंड्याच्या समोरील एका पत्र्याचे शेडपाठीमागे ९६७ ग्रॅम वजनाचे अंदाजे २०,००० रुपये किंमतीचा लालसर रंगाच्या कॅरीबॅग मध्ये तसेच कागदात गांजाच्या बिया व पाला, ओला व सुक्का अंमली पदार्थाचे चिलीम मध्ये भरुन सेवन करीत होते. तसेच अंमली पदार्थाची विक्री करत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळून आले. यावरुन पोलीसांनी अंमली पदार्थ जप्त करुन नमूद नऊ व्यक्तीविरुध्द गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे अधिनियम १९८५ कलम- ८ (क), २० (ब)((ii),(a), २७ अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

## वैद्यकीय पडताळणीत दोषी ठरलेल्या २१ शिक्षकांची होणार विभागीय चौकशी

आरंभ मराठी | धाराशिव

सन २०२३ च्या ऑनलाइन बदली प्रक्रियेत संवर्ग १ मधून लाभ घेणाऱ्या २१ शिक्षकांनी बदलीसाठी कागदपत्रे सादर केली होती. या सादर केलेल्या कागदपत्रात त्रुटी आढळून आल्यामुळे २१ शिक्षकांवर विभागीय चौकशीची कारवाई करण्यात येणार असल्याचे पत्र जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने काढले आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, सन २०२३ मध्ये संवर्ग १ मधून बदल्यामध्ये विषय संवर्ग भाग एकच्या अनुषंगाने सादर केलेली कागदपत्रे तसेच वैद्यकीय प्रमाणपत्राची पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान संबधित शिक्षक कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्राची मुद्दत संपलेली आहे किंवा तपासणी मध्ये आजार आढळून आलेला नाही. तसेच कर्मचाऱ्यांनी दिव्यांग प्रमाणपत्र सादर न करता बदली प्रक्रियेत लाभ घेतल्याचे आढळून आले आहे. तसेच सादर केलेली कागदपत्रे वैद्यकीय प्रमाणपत्र पडताळणीमध्ये जिल्हा शल्य चिकित्सक धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली समितीने नाकारले असल्याने संबधित शिक्षक कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या होत्या. या शिक्षकांची आता विभागीय चौकशी करावी असे आदेश शिक्षण विभागाने काढले आहेत. जिल्ह्यातील २१ शिक्षकांची आता विभागीय चौकशी होणार आहे.

## ज्येष्ठ नागरिकाच्या सोन्याच्या दोन अंगठ्या आणि रक्कम विश्वासघात करून बळकावली

आरंभ मराठी | धाराशिव

ज्येष्ठ नागरिकाची सोन्याची अंगठी दोन व्यक्तींनी विश्वासघात करून बळकावल्याची घटना धाराशिव शहरातील बस स्थानकावर घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, सुभाष देविदास गणेश (वय ७४ वर्षे, रा. विकास नगर धाराशिव) हे दिनांक २५ मे रोजी दुपारी धाराशिव येथील बस स्थानकात गेले होते. त्यावेळी दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांचा विश्वास संपादन करुन आर्थिक फायदा करुन देतो असे सांगून पाच पाच ग्रॅमच्या सोन्याच्या दोन अंगठ्या आणि रोख रक्कम फिर्यादीची दिशाभुल करुन बळकावून नेली.सुभाष गणेश यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३१८(४), ३१६(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## येरमाळ्यात पोलिस यंत्रणा अस्तित्वात आहे का ?, आठवड्यात सलग तिसरी चोरी

आरंभ मराठी | येरमाळा

येरमाळा: राष्ट्रीय महामार्गावर सलग दोन दिवस घडलेल्या चोऱ्यानंतर चोरट्यांनी आता येरमाळा गावात मोर्चा वळवला आहे. मंगळवारी रात्री गावातील अनेक कुलूपबंद घरांचे कुलप तोडून दागिने,रोख रकमेवर डल्ला मारत एक दुचाकी पळवल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे येरमाळा पोलिस यंत्रणा अस्तत्वित आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.मंगळवारच्या रात्री येरमाळा गावातील गुरव गल्लीतील प्रशांत भागवत बेदरे हे पुजारी येडेश्वरी देवी मंदिरावर मुक्कामी होते.यावेळी त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरातील कपाटातील रोख रक्कम ३५ हजार, मुलांच्या दोन अंदाजे पाच पाच हजार असलेल्या पिगी बँक पळवल्या. याच घराच्या शेजारी असलेल्या लता रामचंद्र बेदरे यांचे गेल्या महिन्यात



निधन झाले असून, त्यांना मुली आहेत. त्यांचे घर बंद असल्याने त्यांच्या घरातील साडेतीन ग्रॅमची ठुशी, एक ग्रॅम मनी, पाच हजार रोख चोरट्यानी पळवले. सूर्यकांत बेदरे यांचे घर फोडण्याचा प्रयत्न केला. शेजारी जागे झाले म्हणून पुढे पळ काढत न्हावी गल्लीतील रस्त्यावर राहणाऱ्या सुमन बब्रुवान बारकुल या बाहेर गावी गेल्याने घराचे कुलूप तोडून घरातील २५ हजार रोख दीड ग्रॅमचे कानातले एकफुल चोरून नेले. टेकडीवरील वाड्यातील परशुराम वसंत बारकुल यांचे मंदिरावर हॉटेल असल्याने सध्या वाऱ्यावादळाचे दिवस असल्याने दोन दिवसापूर्वीच अंगावरील दागिने सुरक्षित रहावे म्हणुन घरी कपाटात ठेवले होते. रात्री ते पावसामुळे हॉटेलवरच मुक्कामी राहिल्याने बंद घराचे कुलूप तोडून दोन तोळ्यांचे गळ्यातील कानातील दागिने चोरुन नेले.धान्य गोदामा शेजारी राहणारे सुनील विठ्ठल बारकुल हे रात्री शेतातून मोटार सायकलवरुन भिजत आले. घाई घाईत हॅण्डल लॉक करायचे विसरले. त्यांची हिरो होंडा पॅशन प्लस (एम.एच.२५ ५१९२) गाडी डायरेक्ट करुन चोरुन नेली तर येरमाळा बार्शी रोडवरील पूर्वे चे गल्लीत राहणारे उत्रेश्वर पांडुरंग बारकुल यांच्या घरी राहणाऱ्या बिहारी कामगारांची काळ्या रंगाची टिव्हिएस सिटी मोटार सायकल वायरिंग तोडून पाळवण्याचा प्रयत्न गाडीला पेट्रोल लॉक असल्याने फसला. ती गाडी अज्ञात चोरटे रस्यावर सोड्डन गेले.

## बनावट सही करून चॅरिटेबल ट्रस्टचे ३ कोटी ३६ लाख रुपये बळकावले

आरंभ मराठी | धाराशिव

चॅरिटेबल ट्रस्टचे बनावट कागदपत्र तयार करून आणि खोट्या साह्य करून दोन व्यक्तींनी बँकेतील तब्बल ३ कोटी ३६ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी असद खान मुस्ताफा खान पठाण (ह.मु. हैद्राबाद राज्य तेलंगणा) आणि रुपेश सावरदेकर (रा. सांगली) या दोघांनी ७ जानेवारी २०२५ ते १४ मार्च २०२५ दरम्यान बँक ऑफ महाराष्ट्र शाखा काळा मारुती येथे फिर्यादी सलमान ईक्बाल पठाण (वय ३४ वर्षे द्व रा.दर्गाह रोड गाझीपुरा धाराशिव ह.मु. गणेश नगर, नगर परिषद शाळेजवळ धाराशिव) हे ह्युमन हेल्थ केअर रिर्सोसेस चॅरिटेबल ट्रस्ट धाराशिव चे उपाध्यक्ष आहेत. आरोपी असद खान याने ट्रस्टचे उपाध्यक्ष असलेल्या सलमान पठाण व इतर सदस्यांच्या नावाने बनावट नोटरी बनवली. तसेच ट्रस्टचे उपाध्यक्ष व इतर पाच सदस्य यांची बनावट सही व अंगठे नोटरीवर मारुन त्याआधारे बॅक महाराष्ट्र शाखा काळा मारुती जवळ धाराशिव व इंडियन बॅक शाखा बार्शी नाका धाराशिव येथे खाते उघडले. असद खान याने सांगली येथील आरोपी रुपेश सावरदेकर हा क्रिकेट सट्टा (आयपीएल क्रिकेट मॅच) किंवा ऑन लाईन गेम सट्टा नावाची रक्कम सदर ट्रस्टच्या बँक खाते स्टेट बॅक ऑफ इंडीया, महाराष्ट्र बॅक व इंडियन बॅक शाखा धाराशिव येथील खात्यात एकुण ३,३५,९८,२९२ रुपये रक्कम फिर्यादीची संमती न घेता वापरुन फसवणुक केली. फिर्यादी सलमान पठाण यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३१८(४), ३१६(५), ३३८, ३३६(३), ३४०(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पदनाम बदलास मान्यता दिल्यामुळे कृषी सहायकांचे आंदोलन एक महिन्यांनी अखेर मागे

### जिल्ह्यातील २७९ कृषी सहायक पुन्हा कामावर परतले

आरंभ मराठी | धाराशिव

गेल्या महिनाभरापासून संपावर असलेल्या कृषी पर्यवेक्षक आणि सहायकांच्या मागणीला यश आले असून, राज्य शासनाने पदनाम बदलास मान्यता दिल्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील २७९ कृषी सहायक पुन्हा कामावर परतले आहेत. उपकृषी अधिकारी आणि सहायक कृषी अधिकारी अशा पदनाम बदलास मंगळवारी (ता. २७) शासनाने मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिल्यानंतर कृषी सहायकांनी सुरू केलेले कामबंद आंदोलन मागे घेतले. मात्र, शासनाने केवळ पदनाम बदल ही एकच मागणी मान्य केली असून, वेतनात कोणताही बदल केलेला नाही. शिवाय पदनाम बदलले म्हणून वेतनवाढ किंवा आनुषंगिक मागण्या मान्य करण्यास देखील राज्य सरकारने नकार दिला आहे. दिनांक १ मे पासून कृषी सहायकांनी वेगवेगळ्या मागण्यांसाठी टप्पा आंदोलन तर दिनांक १५ मे पासून कामबंद आंदोलन सुरू केले होते. कृषी सहायकांच्या संपामुळे कृषी आणि मृदा जलसंधारणाच्या विविध कामांना ब्रेक लागला होता. केंद्र शासनाचा ऍग्रीस्टॅक हा महत्त्वाचा प्रकल्प असून, या प्रकल्पांतर्गत ऍग्रीस्टॅक हे राज्यातील कृषी क्षेत्रात डेटा आणि डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने पोहचवण्यासाठी स्थापित केलेली नवीन सुविधा आहे. गावस्तरावर याबाबतचे महत्त्वाचे कामकाज करण्याची जबाबदारी कृषी सहायकांवर सोपविण्यात आलेली आहे. तसेच गावपातळीवर जलतारा हा शासनाचा महत्वाकांक्षी उपक्रम देखील सुरू करण्यात आलेला आहे. या दोन्ही उपक्रमात कृषी सहायकांची भूमिका महत्त्वाची आहे. परंतु, १५ मे पासून



त्यांनी कामबंद आंदोलन सुरू केल्यामुळे या सर्व कामांना ब्रेक लागला होता. तसेच सध्या जिल्ह्यात सर्वत्र पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत. परंतु, कृषी सहायक कामावर नसल्याने पंचनामे देखील झाले नाहीत. आता पंचनाम्याच्या कामाला वेग येईल. कृषी विभागांतर्गत कृषी पर्यवेक्षक व कृषी सहायक यांच्या पदनामात बदल करण्याबाबत विविध संघटनेमार्फत मागणी करण्यात आली होती. त्यानंतर कृषी आयुक्तांनी पदनाम बदलाचा प्रस्ताव सरकारकडे पाठविला होता. मात्र, पदनाम बदलामुळे आर्थिक भाराचे कारण देत वित्त विभागाने हा प्रस्ताव फेटाळला होता. मात्र, राज्यव्यापी आंदोलनाचा दबाव वाढल्याने कृषी पर्यवेक्षक व कृषी सहायक यांच्या पदनामात सुधारणा करून अनुक्रमे उप कृषी अधिकारी व सहायक कृषी अधिकारी असे करण्यास मान्यता देण्यात आली. पदनाम बदलामुळे भविष्यात वेतनश्रेणी वाढी संदर्भात प्राप्त होणारी कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही. असे शासनाने स्पष्ट केल्यामुळे महिनाभर आंदोलन करून फक्त पदनाम बदल ही एकच मागणी कृषी सहायकांच्या पदरात पडलेली आहे. प्रलंबित मागण्यांसाठी लढा सुरूच ठेवणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

## रात्रगस्ती दरम्यान उमरगा शहरातून संशईत तरुण ताब्यात

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा पोलीस ठाण्याचे पथक दिनांक २७ मे रोजी मध्यरात्रीदीड वाजता उमरगा शहरात रात्रगस्ती करत होते. दरम्यान शहरात फिरत असताना नगर परिषद उमरग्याचे इमारतीच्या आडोशाला रोडच्या बाजूला उमरगा येथे अंधाराचा दबा धरुन बसलेल्या एका तरुणाला संशयावरुन पथकाने हाटकले. यावर त्याची विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव सलीम ईक्बाल बागवान (वय २३ वर्षे, रा. मुन्सी प्लॉट उमरगा) असे सांगीतले. पोलीसांनी अशा रात्री अवेळी फिरण्याचे कारण विचारले असता, त्याने पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे दिल्याने तो चोरीच्या उद्देशाने तेथे फिरत असल्याचा पोलीसांचा संशय बळावल्याने त्याला ताब्यात घेतले. पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन त्याच्याविरुध्द महाराष्ट्र पोलिस कायदा कलम- १२२ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीवर तातडीने उपाययोजना करा

### डॉ.प्रतापसिंह पाटील यांची कृषी आणि मदत व पुनर्वसन मंत्र्यांकडे मागणी

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून शेतपिके, फळबागा, भाजीपाला आणि काही ठिकाणी शेतकऱ्यांची घरेही बाधित झाली आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे प्रदेश सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी राज्य सरकारकडे तातडीच्या मदतीची मागणी केली आहे. डॉ. पाटील यांनी यासंदर्भात मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद जाधव पाटील यांना पत्राद्वारे विनंती केली असून, जिल्ह्यातील सर्व तहसील आणि गावांमध्ये तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत मंजूर करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच, कृषी मंत्री ना.ॲड. माणिकराव कोकाटे यांनाही स्वतंत्र पत्र लिहून कृषी विभागामार्फत योग्य त्या उपाययोजना कराव्यात, आणि



जिल्हा प्रशासनाला तातडीचे आदेश देऊन पंचनाम्याची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत, असे त्यांनी नमूद केले आहे. ''शेतकरी हाच देशाचा खरा कणा आहे. अशा संकटाच्या काळात त्याला सरकारकडून त्वरित आधार मिळणे आवश्यक आहे. अन्यथा आत्महत्यांचे प्रमाण वाढण्याची भीती आहे,'' असे प्रतिपादन करत डॉ. पाटील यांनी सरकारने संवेदनशीलता दाखवून त्वरित हालचाली कराव्यात, अशी जोरदार मागणी केली आहे.

CMYK

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
संपादकीय
गुरूवार दि.29 मे 2025

# बदलेल्या ऋतूमानाचा धोकादायक इशारा

दिनांक २७ मे रोजी लातूर शहरात अनपेक्षितपणे मुसळधार पाऊस बरसला. मागील काही वर्षे आपण पाहिले आहे की मंजरा नदीत ऑगस्टमध्ये थोडेफार पावसाचे पाणी वाहताना दिसायचे .परंतु यावर्षी मे महिन्यातच मांजरा नदीला पूर आला आहे. कधी नव्हे ते मे महिन्यात महाराष्ट्रात सर्वत्र मुसळधार पाऊस पडत आहे. जिकडे तिकडे पाणीच पाणी वाहू झाले आहे.नद्या नाले दुथडी भरून वाहू लागले आहेत.गावोगावी पावसाने धुमाकूळ घातला आहे. विजा पडून अनेक माणसे व मुकी जनावरे दगावली आहेत.मुंबई,पुणे व इतर शहरांना मुसळधार पावसाने झोडपले आहे.पुर्वी मे महिन्यात दोन चार दिवस अवकाळी पाऊस पडायचा आणि उघडायचा.परंतु,यावर्षी मे महिन्यात दररोज अनपेक्षित असा धो धो पाऊस पडत आहे.केरळ राज्यात मान्सून येण्याच्या अगोदरच महाराष्ट्रात तुफानी पावसाचे जोरदार आगमन झाले आहे.ऋतूमान बदलत असल्याची ही एक खतरनाक झलक निसर्ग आपणाला दाखवत आहे.जर खरेच प्रत्यक्षात ऋतूचक्र बदलले आणि केव्हाही पाऊस,कधीही उन्हाळा आणि केव्हाही हिवाळा होऊ लागला तर मग पर्यावरण धोक्यात आल्याचा हा इशारा आपण समजून घेतला पाहिजे.असे झाले तर मग पृथ्वीवर वर्चस्व मिळवलेल्या स्वार्थी मानवाला पृथ्वीवर जीवन जगणे अवघड होईल!



बदललेल्या ऋतूमानाचा मानवी जीवनावर दूरगामी परिणाम तर होतीलच. परंतु,शेतकऱ्यांना शेती करणे फार अवघड होईल.पेरणी कधी करायची?खरीप हंगाम केव्हा व रब्बी हंगाम केव्हा होणार?याचे गणित बिघडून जाईल आणि आपणाला निसर्गाची करणी काही कळणार नाही. सतत पाऊस पडू लागला आणि नेहमीच चक्रीवादळे येऊ लागले तर शेतकऱ्यांना शेती करणे फार जिकिरीचे होऊन जाईल.शेती पिकावर अवलंबून असलेल्या उद्योगधंद्यांचा खेळखंडोबा होणार आहे.एकूणच काय तर बदललेल्या ऋतूमानाचे दुष्परिणाम आपल्या सगळ्यांना भोगावे लागणार आहेत. पर्यावरणाचा समतोल बिघडून तर गेलाच आहे.या सगळ्या विनाशाला केवळ माणूस नावाचा प्राणी जबाबदार आहे हे आपण लक्षात घ्यायला हवे.आपण झाडांची बेसुमार कत्तल केली आहेच. सिमेंटचे जंगल निर्माण केले,धूर ओकणारे कारखाने उभे केले, विषारी रसायनांचा बेसुमार वापर वाढवलाय,नद्या व समुद्र प्रदूषित केले आहेत आणि जिकडे तिकडे प्लॅस्टिकचा कचरा केलाय.शहरात व गावोगावी प्लॅस्टिकचे व जैविक अजैविक कचऱ्यांचे ढीग साचलेले दिसतात.ही सगळी दुष्कृत्ये आपण सगळ्यांनी केली आहेत.याचा परिणाम सुंदर अशा पर्यावरणावर तर झालाच आहे.आता ऋतूचक्र धोक्यात आले आहे.माणूस या नात्याने आपण याचा गंभीर विचार करायला हवा.पर्यावरणाला घातक अशा कृतींचा आपण तात्काळ त्याग केला पाहिजे.वृक्षारोपण करणे,झाडांचे संवर्धन व रक्षण करणे आपल्या सर्वांचे परमकर्तव्य आहे.धूर ओकणारी जुनी वाहने कायमची भंगारात काढली पाहिजेत.तेव्हा कुठे आपणाला पर्यावरणाबद्दल भाष्य करण्याचा अधिकार राहणार आहे.पाऊस पडल्यावर गावात व शहरात जागोजागी पाणी साचत आहे. गटारे व नाले लगेच तुंबतात.हे पाहून आपण प्रशासनाच्या नावाने बोटे मोडतो पण आपण उघड्यावर प्लॅस्टिकचा कचरा फेकून देतो याबाबत कधीच भाष्य करत नाही. हा प्लॅस्टिकचा कचरा जो कधीच कुजत नाही तो तसाच साचून राहतो. आपली मुले फास्ट फूड खातात आणि त्यांचे रॅपर्स व वेष्टने फेकून देतात.नवीन फॅशन म्हणून की काय लग्नकार्यात प्लॅस्टिकच्या पत्रावळ्या,द्रोण,ग्लास या वस्तूंचा वापर वाढलाय.वापर करून ते आपण फेकून मोकळे होतो.तो कचरा जीवघेणा ठरतो आहे. म्हणजे आपण सुजाण व सूज्ञ नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडत नाही.पण इतरांना शहाणपण शिकवायला नेहमी तयार असतो.त्यापेक्षा आपण आपल्या पृथ्वीला व पर्यावरणाला जीवापाड जपले पाहिजे.तरच बदलणारे ऋतूचक्र मूळ अवस्थेत कायम राहतील.

बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो. ९५४५४४२६४८.

# स्वार्थी मानसिकता बदलली पाहिजे.

देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर पहिले भारत सरकारनेनियतीशी करार म्हणून कार्यक्रम जाहीर केला होता. त्यात' स्त्रिमुक्ती 'ला प्राधान्य दिले होते.स्त्री– पुरुष समानता युगाचा उदय झाल्यानंतर प्रामुख्याने सुशिक्षित महिला चूल–मुल घरातून बाहेर आल्या, समाजकारण, राजकारण यात सक्रिय होऊ लागल्या.तथापि आपल्या पुरूषी वर्चस्ववादी संस्कृतीमुळे त्यांचे कर्तृत्व मर्यादित राहिले. अपवादात्मक ठरलेल्या महिलांचा मग अभिमान बाळगला जाऊ लागला. स्त्रीमुक्तीची प्रक्रिया खूपच मंदगतीने होत राहिली.केंद्र आणि राज्य सरकारांनी महिलांसाठी विविध कायदे केले.त्यांना अधिक संरक्षण देण्याचा प्रयत्न केला. गावोगावी सुशिक्षित महिलांचे प्रमाण वाढत गेले.परंतू त्या घर संसारालाच बांधलेल्या राहिल्या. खेदाची बाब म्हणजे सुशिक्षित उच्चभ्रू समाजांमध्ये प्रतिष्ठा,पैसा,अवाजवी मागणी यासाठी स्त्रियांचा मानसिक छळ,मारहाण, आत्महत्येस प्रवृत्त करण्याचे लक्षात घेण्यासारखे वाढतच चालले आहे.याचाच अर्थ स्वार्थी पुरूषी मानसिकता बदलण्यावर भर देवूनच महिला सबलीकरणाची वाटचाल व्हायला हवी.पण दुर्दैव असे की,,पुरूषी मानसिकतेच्या मक्तेदारीचा जसा भाग आहे. तथापि, असे असूनही आजची स्त्री निश्चितच प्रगतीच्या दिशेने झेपावत आहे.हे नाकारता




येण्यासारखेनाही. अनेक ठिकाणी महिलांनी आपल्या हाती आलेल्या कायद्याच्या हत्याराचा नामी वापर करून व्यसनी,लालची,स्वार्थी पतीच्या पत्नी,मुलांना ही अभय मिळवून दिले आहे.मात्र राजकारणातील महाशक्तीच्या एकजूटी पुढे त्याचा निभाव लागू न देणे ,तसेच भेद निर्माण करण्यात समाज कंटक ही यशस्वी होताना दिसतात. उठाव करू पाहणाऱ्या महिलांवर घरच्या माणसांकडून दबाव आणला जातो. या देशात कायदे केले जातात मात्र त्याची संबंधित यंत्रणांकडून यथायोग्य अंमलबजावणी केली जात नाही.केवळ कागदोपत्रीच आकडेवारी सजविण्यात धन्यता मानली जाते.याचाच अर्थ असा की,स्वातंत्र्यानंतर जे करणे आवश्यक आहे जे ईप्सित किंवा साध्य मानले गेले त्याविषयी खऱ्या अर्थाने देशात कुणालाच आस्था उरलेली नाही. सर्वत्रच बजबजपुरी माजून राहिली आहे,ती हित संबंध आणि भ्रष्टाचाराची !.मिळालेले स्वातंत्र्य राजकारण्यांच्या दावणीला बांधून नासवून टाकले आहे असेही विचारवंत म्हणतात. दुर्दैव असे की,आपण स्वातंत्र्यानंतर नागरिकांच्या अंगी राष्ट्रीय चारित्र्य, संस्कार, महिलांवरील अत्याचार, हे पुरुषी अंगी बनविण्याकडे जसे दुर्लक्ष केले तसेच सामाजिक मूल्ये टिकविण्यात उदासिनता दाखवली.नि याचाच फटका भारतीय महिलांना आणि त्यांच्या चळवळीला बसला. हेसारे अनुभव जमेस धरूनच महिला सबलीकरणाच्या धोरणांचा आणि योजनांचा विचार व्हायला हवा.यशस्वीतेसाठी त्याची अतिव अवश्यकता आहे.सर्वच पातळीवर महिलांची जी अवहेलना होते ,ती कटाक्षाने थांबवली पाहिजे.महिलांविषयी खरोखरीची आदरभावना समाजात, यंत्रनेत व शासनात असण्यानेच महिलांचे सबलीकरण यथायोग्यपणे साधले जाऊ शकेल .पुरूषी मानसिकता देखील महिला सशक्ती करण्यात धोंड बनत असते हे ही




सोमनाथ बेलूरे

लक्षात घ्यायला हवे.समाजात हुंडाबळी,मानसिक छळ, बलात्कार, आत्महत्येस प्रवृत्त करणे, अशा अनेक विषयांवर भाषणे ,व्याख्यान देण्यापेक्षा पुरूष प्रधान संस्कृतीत महिलां विषयी आदरभाव निर्माण करणे आवश्यक असून स्वार्थी मानसिकता बदलण्यावर भर द्यावा लागेल.

# राष्ट्रप्रथम: सावरकरांच्या विचारांची अमर ज्वाला

## "व्यक्तींपेक्षा राष्ट्र मोठं;आणि राष्ट्रापेक्षा कोणीही मोठं नाही."-स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

२८ मे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करणयात आली. क्रांती, विचार आणि राष्ट्रनिष्ठेचा झळाळता संगम असलेले सावरकर हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू होता ''राष्ट्रप्रथम''. या तत्त्वज्ञानाने त्यांच्या प्रत्येक कृतीला दिशा दिली आणि आजही तो विचार भारतीय समाजाला जागरूक करतो आहे.सावरकरांसाठी धर्म, जात, प्रांत, भाषा या सर्व गोष्टी राष्ट्राच्या हिताच्या आधीन होत्या. त्यांच्या मते, जर कोणतेही तत्व राष्ट्राच्या एकतेस, सुरक्षिततेस किंवा प्रगतीस अडथळा आणत असेल, तर त्या तत्वाचा त्याग करायला हवा. 'राष्ट्र' हेच सर्वोच्च मूल्य आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. ते म्हणत, ''व्यक्तींपेक्षा राष्ट्र मोठं; आणि राष्ट्रापेक्षा कोणीही मोठं नाही.'' हेच त्यांच्या जीवनाचं ब्रीदवाक्य बनलं. ब्रिटिश सत्तेने सावरकरांना अंदमानच्या सेलुलर जेलमध्ये काळ्या पाण्याची शिक्षा सुनावली, पण तेथेही त्यांनी राष्ट्रप्रेमाची मशाल जळती ठेवली. अतीव हालअपेष्टांतही त्यांनी क्रांतीकारक कैद्यांमध्ये आत्मविश्वास



जागवला, देशभक्तीचे संस्कार पेरले. कारावासात असतानाही त्यांनी अनेक लेख, कविता आणि विचार लिहून 'राष्ट्रप्रथम'च्या संकल्पनेला अधिक बळ दिले. सावरकरांचे 'हिंदुत्व' हे केवळ धार्मिक संकल्पना नव्हते, तर ती राष्ट्रसंकल्पनेची सांस्कृतिक मांडणी होती. त्यांच्या दृष्टीने, हिंदुत्व म्हणजे या भूमीवर जन्मलेला आणि तिच्यावर निष्ठा असलेला प्रत्येकजण. म्हणूनच ते अस्पृश्यता, अंधश्रद्धा, जातिभेद याविरोधात ठाम उभे राहिले. त्यांच्या सामाजिक सुधारणाही राष्ट्रहिताच्याच दृष्टीने होत्या. सावरकरांना वाटत होतं की भारत जर खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि सशक्त बनायचा असेल, तर प्रत्येक भारतीयाच्या मनात 'राष्ट्रप्रथम' ही भावना ठाम हवी. त्यांनी सैनिकी शिक्षण, शौर्य, शिस्त, राष्ट्रभक्ती यांचा प्रचार केला. त्यांची मागणी होती की तरुणांनी केवळ पुस्तकी शिक्षण न घेता राष्ट्राच्या सेवेसाठी मानसिक आणि शारीरिकदृष्ट्याही सक्षम व्हावे. आज भारत अनेक अंतर्गत व बाह्य आव्हानांशी झुंज देतो आहे तंत्रज्ञानातील स्पर्धा, सीमाभागातील अस्थिरता, सामाजिक विद्वेष, आणि सांस्कृतिक घुसखोरी. अशा वेळी सावरकरांचा 'राष्ट्रप्रथम'चा विचार अधिक सुसंगत वाटतो. विविधतेतील एकता, राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य, सामाजिक समरसता आणि स्वतंत्र विचारसरणी यांचा संगम साधण्याची प्रेरणा त्यांच्या तत्त्वज्ञानातून मिळते. सावरकरांच्या जयंतीनिमित्त पुष्प अर्पण करणे हे श्रद्धेचे प्रतीक असले तरी त्यांची खरी आठवण म्हणजे त्यांच्या विचारांना कृतीत उतरवणे. आज देशासाठी काहीतरी करायचे असेल, तर 'राष्ट्रप्रथम' या विचाराला मन, वचन आणि कर्माने स्वीकारणे आवश्यक आहे.

– हर्षवर्धन दिलीप मडके
प्रतिनिधी, आरंभ मराठी.

# सार्वजनिक बदल्या करण्यापूर्वी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकाऱ्यांची पदोन्नती करण्याची मागणी



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यापूर्वी जिल्ह्यातील मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी यांच्या रिक्त जागेवर शिक्षकामधून पदोन्नती करावी तसेच प्राथमिक, पदवीधर अतिरिक्त झालेल्या शिक्षकांची त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना पदावणत करावे अशी मागणी धाराशिव जिल्हा सर्व संघटना समन्वय समितीच्या वतीने धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष व शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.यावेळी शिष्टमंडळात संघाचे बाळकृष्ण तांबारे, संघाचे जिल्हाध्यक्ष बिभिषण पाटील, समितीचे राज्य सदस्य कल्याण बेताळे, एकल चे पवन सूर्यवंशी, परिषदचे बळवंत घोगरे, अभय यादव, बापू शिंदे आदी संघटनेचे लोक उपस्थित होते.

# हट्ट असावा कसा?

अजब गजब या दुनियेत
हट्ट असावा तो कसा?
असावा नेकीने वागण्याचा
इमानदारीने जगण्याचा

बालहट्ट असावा नवलाईचा
नवनवीन खेळणे मागण्याचा
कुतूहल जाणून घेण्याचा
नवीन गोष्टी शिकण्याचा

हट्ट असावा विद्यार्थ्यांचा
वह्या पुस्तके मागण्याचा
एकाग्रतेने अभ्यास करण्याचा
जीवन ध्येय गाठण्याचा

हट्ट कमावत्या मुलांचा
व्यसनांपासून दूर राहण्याचा
सर्वांना सुखात ठेवण्याचा
आईवडिलांना सांभाळण्याचा

हट्ट असावा पत्नीचा
संसार नेटका करण्याचा
कुटुंबाला एकत्र जपण्याचा
सासूसासऱ्यांना जीव लावण्याचा
हट्ट असावा राजकारण्यांचा
समाजकारण जपण्याचा
लोकहिताची कामे करण्याचा
लोकशाही अबाधित ठेवण्याचा

हट्ट असावा नोकरदारांचा
प्रामाणिक नोकरी करण्याचा
शासनाकडे हक्क मागण्याचा
जनतेशी संवाद साधण्याचा

हट्ट असावा सगळ्यांचा
चांगले विचार अंगिकारण्याचा
दूर्गूणांचा त्याग करून
माणुसकीला जपण्याचा

हट्ट असावा सुजाण नागरिकांचा
पर्यावरणाचा समतोल राखण्याचा
निवडणुकीत मतदान करून
लोकशाही बळकट करण्याचा


– बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८

# मोहा परिसरात अवकाळी पावसाचा कहर: आंबा बागायतदारांचे मोठे नुकसान, पेरणीचा खोळंबा

## १० दिवसांत १८९ मिमी पाऊस; मोहा परिसरातील पेरणीपूर्व मशागत खोळंबली

हर्षवर्धन मडके | आरंभ मराठी

मोहा –मे महिन्याच्या अखेरीस आलेल्या अवकाळी पावसाने मोहा मंडळातील शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये अधिकच भर घातली आहे. अवघ्या दहा दिवसांत या भागात १८९ मिमी पावसाची नोंद झाली असून, यातील सर्वाधिक पाऊस २७ मे रोजी तब्बल ६७.५ मिमी इतका पडला. या अवकाळी पावसामुळे विशेषतः आंबा बागायतदारांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागत आहे. परिसरातील सुमारे ४० शेतकऱ्यांच्या २८.७७ हेक्टर क्षेत्रावरील आंबा फळबागांचे गंभीर नुकसान झाले असून, शेतकऱ्यांनी नुकसानीचे पंचनामे करून तातडीने आर्थिक मदतीची मागणी केली आहे. पाऊस परतीचा नसून अवकाळी असतानाही त्याचा जोर इतका होता की, अनेक भागात नाल्यांना पूर आल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. आंबा बागायतदारांचे फुलोऱ्यावर आलेले किंवा फळधारणेच्या अंतिम टप्प्यातील



झाडांवर याचा प्रत्यक्ष परिणाम झाला आहे. पावसामुळे फळे गळून पडली, तर काही ठिकाणी पाणथळ झाल्याने झाडांची मुळे कुजण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या अवकाळी पावसाने केवळ फळबागांनाच नव्हे तर खरीप हंगामालाही मोठा धक्का दिला आहे.

## मान्सून वेळेवर, पण शेतकरी अडचणीत; मशागत अपूर्ण, पेरणीला विलंबाची शक्यता

यंदा मान्सून महाराष्ट्रात वेळेवर दाखल झाला असला तरी मोहा मंडळातील सुमारे ७५% शेतकऱ्यांची पेरणीपूर्व मशागत अद्याप अपूर्ण आहे. या पार्श्वभूमीवर एक गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. वेळेवर आलेला मान्सून शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार की आणखी अडचणी निर्माण करणारा ठरणार हे येणाऱ्या काळात दिसणार आहे. साधारणतः शेतकरी मान्सूनपूर्व मशागतीचे काम पूर्ण करून ठेवतात, जेणेकरून पहिल्याच पावसावर पेरणी करता येईल. मात्र अवकाळी पावसामुळे शेतजमिनीत पाणी साचले असून जमीन भिजल्याने ट्रॅक्टर, बैलजोडी यांची हालचाल अशक्य झाली आहे. अशा स्थितीत आता पडणारा नियमित मान्सून पाऊस मशागतीसाठी आणखी अडथळा ठरू शकतो. पेरणीचे वेळापत्रक आधीच कोलमडलेले असताना पुढील पावसामुळे कामे अधिक लांबणीवर जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम वेळेत सुरू होईल की नाही, यावर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उशिरा होणारी पेरणी ही शेती उत्पादनावर आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर मोठा परिणाम करणारी असते. योग्य वेळ साधली गेली नाही तर पीक उत्पादनात घट येते, कीड–रोगाचा प्रादुर्भाव वाढतो आणि शेतकऱ्यांच्या मेहनतीचे चीज होत नाही.

### कृषी सहाय्यक गावात अनुपस्थित : शेतकऱ्यांत नाराजी

शेतकऱ्यांचे आणखी एक महत्त्वाचे संकट म्हणजे कृषी विभागाचे अपुरे सहकार्य. गावात नुकतेच कृषी सहाय्यक डोंगरे यांनी पदभार स्वीकारला असला तरी शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ते अद्याप गावात फिरकलेलेच नाहीत. कृषी सहाय्यकांचा संप सुरू होण्याआधीच पदभार स्वीकारूनही शेतकऱ्यांच्या अडचणींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. शेतकरी पंचनाम्यासाठी कृषी सहाय्यकांच्या भेटीची वाट पाहत आहेत, मात्र त्यांच्या अनुपस्थितीमुळे पंचनाम्यांची प्रक्रिया रखडत आहे. त्यामुळे याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालण्याची मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

### शेतकऱ्यांची आर्थिक मदतीची मागणी

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी यासाठी शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय व कृषी विभागाकडे अर्ज केले आहेत. यासाठी तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना विमा योजना व शासन अनुदानांतर्गत मदत मिळावी, अशी मागणी होत आहे. सध्या शेतकऱ्यांच्या हातात उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

# तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या भरती प्रक्रियेच्या चौकशीसाठी ठिय्या आंदोलन

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजाभवानी मंदिर संस्थान तुळजापूर येथील लेखापाल यांच्या २०१३ पासून आज पर्यंतच्या कामकाजाची चौकशी करून कारवाई होत नसल्यामुळे तसेच मागील वर्षी ४७ जणांची भरती प्रक्रिया केली, ज्यामध्ये १३ ते १५ पदे वाढवण्यात आली असून याबाबत संकेतस्थळावर कुठलीही माहिती न देता वाढवण्यात आली आहे. वाढीव पदाची चौकशी करून संबंधितांवर कारवाही होत नसल्यामुळे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप खंडापूरकर यांच्या आदेशावरून जिल्हाध्यक्ष गणेश पाटील हे आज (दि.२९) सकाळी ११ वाजता तुळजाभवानी मंदिर संस्थान कार्यालय येथे ठिय्या आंदोलन करणार असल्याची माहिती गणेश पाटील यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

दैनिक आरंभ मराठी
संमिश्र
गुरूवार दि.29 मे 2025

# राजकीय एकोप्याचा ऐतिहासिक क्षण..भाजप जिल्हाध्यक्षांचा पत्रकार व मित्रपरिवाराच्या वतीने सत्कार,सर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती

आरंभ मराठी | धाराशिव

भाजपाच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी दत्ताभाऊ कुलकर्णी यांची दुसऱ्यांदा निवड झाल्यानंतर त्यांच्या सन्मानार्थ एक आगळावेगळा कौतुक सोहळा पार पडला. पत्रकार आणि मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, राजकीय पक्षभेद बाजूला ठेवून विविध पक्षांचे नेते एका व्यासपीठावर एकत्र आले होते. या ऐतिहासिक कार्यक्रमात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिवसेना (उद्धव ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट), मनसे, शेतकरी कामगार पक्ष यांच्यासह अनेक विविध राजकीय पक्षांचे मान्यवर नेते आणि स्थानिक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. एकता आणि सौहार्दाचे हे दुर्मीळ चित्र राजकीय क्षेत्रात अपवादात्मक ठरले.कार्यक्रमात ''मन मोकळ्या गप्पा'' या संवाद सत्राच्या माध्यमातून दत्ताभाऊंनी धाराशिव जिल्ह्यातील उद्योजकतेच्या संधी, तरुण नेतृत्वाच्या गरजा आणि आत्मनिर्भरतेसाठी आवश्यक मानसिकता यावर आपले प्रेरणादायी विचार मांडले.व्यासपीठाकडे पाहत दत्ताभाऊ भावुक होत म्हणाले, माझ्या २८ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत असा प्रसंग मी प्रथमच अनुभवत आहे. इतक्या विविध पक्षांचे नेते एका व्यासपीठावर उपस्थित राहून मला गौरवतात, हे दृश्य मीच काय, कुणीही याआधी पाहिले नसेल. हा खरंच ऐतिहासिक क्षण आहे. पुढे ते म्हणाले, आपल्याला जिल्ह्यात उद्योजक घडवायचे आहेत. जसे श्वासावर प्रेम असते तसेच उद्योगावरही प्रेम हवे. शेती, सौरऊर्जा, गूळ पावडर





यांसारख्या क्षेत्रांमध्ये धाराशिव जिल्हा मोठ्या संधी घेऊन पुढे जात आहे. प्रत्येकाच्या हाताला काम मिळाले पाहिजे. चेहरा, चरित्र आणि मेहनत या त्रिसूत्रीवर विश्वास ठेवला, तर कोणतीही यशाची शिखरं गाठता येतात. कार्यक्रमात विविध माध्यमांचे प्रतिनिधी, समाजातील सर्व स्तरांतील नागरिक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. काँग्रेसचे प्रशांत पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करताना दत्ताभाऊंच्या उद्योजकतेविषयीच्या दृष्टिकोनाबरोबरच त्यांच्या मैत्रीपूर्ण स्वभावाचेही विशेष कौतुक केले. तसेच विविध सामाजिक कामात अश्याच पद्धतीने एकत्र येऊ असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश पोतदार यांनी प्रभावीपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन धाराशिव जिल्हा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष चंद्रसेन देशमुख यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम उत्साह, आत्मीयता आणि आपुलकीच्या वातावरणात पार पडला.

### व्यासपीठावर उपस्थित सर्वपक्षीय नेते

यावेळी व्यासपीठावर काँग्रेस पक्षाचे अग्निवेश शिंदे, प्रशांत पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे रवी वाघमारे, बंडू आदरकर, भाजपा युवा मोर्चाचे राजसिंहा राजेनिंबाळकर, अभय इंगळे, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे अय्याज शेख, रणवीर इंगळे, राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे सचिन तावडे, शिवसेना शिंदे पक्षाचे सनी पवार, मनसेचे निलेश जाधव, शेकापचे अमोल दीक्षित यांची उपस्थिती होती.

## रुपामाता परिवारातर्फे स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन



आरंभ मराठी | धाराशिव

रुपामाता परिवारातर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित त्यांना अभिवादन करण्यात आले. रुपामाता कॉर्पोरेट ऑफीस समर्थ नगर धाराशिव येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या १४० व्या जयंतीनिमित रुपामाता समुहाचे प्रमुख ॲड व्यंकटराव गुंड यांच्या हस्ते प्रतिमेस पुजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी रुपामाता समुहाचे व्यवस्थापकीय संचालक अजित गुंड, जनरल मॅनेजर दामोदर शितोळे, चिफ इंजिनिअर समुद्रे सर, काटे सर, बालाजी यादव, कैलास गोरे, मोरे सर, विलास होदाडे, महेश जाधव इतर अधकिारी, कर्मचारी, शेतकरी उपस्थित होते.

# अरुंद शेत रस्ते होणार बारा फुटांचे; महायुती सरकारचा क्रांतिकारी निर्णय

### माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी मानले सरकारचे आभार

आरंभ मराठी | परंडा

महाराष्ट्राचा आधुनिक शेती व वाढत्या यांत्रिकीकारणाचा वेग लक्षात घेऊन महसूल विभागाने बांधावरील अरूंद शेतरस्ते बारा फूटांचे करण्याचा अतिशय क्रांतिकारी व ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल भाजपा नेते मा. आ. सुजितसिंह ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व महायुती सरकारचे आभार मानले आहेत. बांधावरून जाणारे सध्याचे पारंपारिक अरुंद शेतरस्ते आधुनिक कृषी अवजारांची ये – जा सुलभ व्हावी, तसेच शेतीमाल योग्य वेळेत बाजारपेठेत पोहचावा यासाठी ३ ते ४ मीटर, म्हणजे जवळपास १२ फूट करण्यात येणार आहेत. पारंपरिक शेत रस्ता बांधणीच्या १९६६ च्या निर्णयानंतर प्रथमच म्हणजे, सुमारे ६० वर्षांनी महाराष्ट्राच्या आधुनिक शेतीसाठी हा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून शेतकरी हिताची पायाभरणी होत असून, सर्वंकष सर्व बाबींचा विचार करून हा निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विभागाने घेतला आहे. विशेष म्हणजे, शेतरस्त्यांच्या जागांमध्ये अतिक्रमणासह भविष्यातील खरेदी विक्रीच्यावेळी अन्य शेतीविषयक वाद उद्भवू नयेत म्हणून या शेतरस्त्याची नोंद जमिनीच्या ७/१२ मध्ये होणार आहे. हे शेतरस्ते जलदगतीने पूर्ण करण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत प्रकरण निकाली काढण्याबाबत शासन आदेश जारी केले आहेत. शेतकऱ्यांना आधुनिक शेती व उत्पन्नवाढीसाठी या



निर्णयाचा निश्चितच शेतकऱ्यांना लाभ होईल, असे सुजितसिंह ठाकूर यांनी म्हटले आहे.

# सकल मराठा समाज मोफत वधु-वर सूचक समितीतर्फे नूतन पोलीस अधिक्षकांचा सत्कार

आरंभ मराठी | धाराशिव

महाराष्ट्र शासनाने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती अधिक चांगली करण्याच्या उद्देशाने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असून या बदल्यांतर्गत रितु खोकर (भा.पो.से.) यांची धाराशिव जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती झाली. त्याबद्दल बुधवार दि.२८ रोजी मराठा समाज मोफत वधु-वर सूचक समिती धाराशिवच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. पोलीस अधिक्षक रितु खोकर यापूर्वी सांगली येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत होत्या.धाराशिवचे विद्यमान पोलीस अधीक्षक संजय जाधव यांची बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी आता रितु खोकर या जिल्ह्याच्या पोलीस यंत्रणेची धुरा सांभाळणार आहेत. नवीन पोलीस अधीक्षक रितु खोकर यांच्याकडून कायदा आणि सुव्यवस्था अधिक मजबूत करण्याची अपेक्षा उपस्थित सकल मराठा



समाज मोफत वधु -वर सुचक समितीमधील सदस्यांनी यावेळी व्यक्त केली.यावेळी सकल मराठा समाज मोफत वधु-वर समितीतील प्रा.अभिमान हंगरगेकर, अशोक गायकवाड, अशोक चव्हाण, गोरोबा लोंढे, नवनाथ पवार, राजू तांबे, अण्णासाहेब कदम, कमलाकर मुंडे, दत्तात्रय घाडगे, संजय शिंदे, अमोल निंबाळकर, अशोक ठोंबळ, अर्जुन जाधव उपस्थित होते.

# जयोस्तु प्रतिष्ठानच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

आरंभ मराठी | धाराशिव

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त जयोस्तु प्रतिष्ठान धाराशिव यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवराय व स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार कैलास घाडगे पाटील, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, भाजयुमोचे राजसिंहा राजेनिंबाळकर, माजी नगरसेवक अक्षय ढोबळे, पंकज पाटील, देविदास पाठक, भोसले हायस्कूलचे कलाध्यापक शेषनाथ



वाघ , शिवशंभु विचार मंचचे डॉ. शिवाजी चव्हाण, ब्राह्मण कल्याण ट्रस्टचे धनंजय जेवळीकर, विपिन गंधोरकर, तसेच संकेत सूर्यवंशी , प्रशांत महाजन त्याचबरोबर जयोस्तु प्रतिष्ठानचे अध्यक्ष सारंग जोशी, सुदर्शन कुलकर्णी, राहुल तुगांवकर, राहुल देशपांडे, अभिजीत रोंधवे, अक्षय कुलकर्णी पदाधिकारी व शहरातील सावरकर प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याच बरोबर उपस्थित मान्यवरांचे जयोस्तु प्रतिष्ठानच्या वतीने सावकार प्रतिमा सन्मानचिन्ह, शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. सुत्रसंचलन सारंग जोशी यांनी केले तर आभार राहुल तुगावकर यांनी मानले.

# रोचकरी बंधूकडून दहावी व बारावी परिक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर येथील गोलाई ग्रुप आणि रामचंद्र व निलेश रोचकरी यांच्या माध्यमातून शहरातील एस. टी.कॉलनी, मस्के प्लॉटींग, हेलीपॅड फिल्टर टाकी परिसरातील दहावी व बारावी परिक्षेत यश प्राप्ती करणाऱ्या विद्यार्थ्यांचा रेस्ट हाऊस येथे सत्कार करण्यात आला. नळदुर्ग रोड भागातील यशस्वी विद्यार्थ्यांना एकत्रितपणे संवाद साधत भावी शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा देत फेटा, गुलाब फुल आणि भेटवस्तू देऊन ३१ उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. गोलाई ग्रुपचे मार्गदर्शक रामचंद्र व निलेश रोचकरी बंधूंच्या या स्तुत्य उपक्रमाचे शहरात कौतुक होत आहे. याप्रसंगी युवा नेतृत्व रामचंद्र रोचकरी, निलेश रोचकरी, प्रविण केवडकर, आनंद रोचकरी, अमर बागल, बालाजी पाटील, संदीप सुरवसे,मदणे काका व मित्र परिवार उपस्थित होते.

# नंदगावच्या जिल्हा परिषद शाळेत माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

आरंभ मराठी | नळदुर्ग

माणसाच्या आयुष्यातली शालेय जीवन ही अशी आठवण असते जी माणसाच्या हृदयात कायम घर करून राहते. अशाच आठवणींना उजाळा देण्यासाठी तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळाच्या २००० सालाच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी पंचवीस वर्षांनी एकत्र येत स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते. हा मेळावा अत्यंत भावनिक अविस्मरणीय उत्साह पूर्ण ठरला असून माजी विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. तत्कालीन शिक्षक आर. डी.माने, एस.एन.वऱ्हाडे, पी. ए.जाधव, यांचा त्यावेळी विद्यार्थ्यांचे जीवन घडवण्यामध्ये योगदान दिले होते म्हणून या शिक्षकांचा सन्मान चिन्ह व




पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विविध पदावर विराजमान झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी आजही शाळेबद्दल आदर व शिक्षका विषयी कृतज्ञता बाळगून आहोत हे या मेळाव्याच्या माध्यमातून दिसून येत होते. काहींनी भावनिक होऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि आनंदात व उत्साहात हा स्नेहसंमेलन कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आप्पाराव होळे यांनी केले. यावेळी सुनील बनसोडे, महेबुब शेख, मनोज पाटील, महादेव कोरे, सुलोचना मोरे बसवराज चिनगुंडे, अनुराधा कांबळे , रेवणसिद्ध चिनगुंडे,सारिका खजुरे यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

# मोफत एक्स-रे शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद: मोहा आरोग्य केंद्रात ८० नागरिकांनी घेतला लाभ

### ‘टीबी मुक्त गाव’ उपक्रमांतर्गत आरोग्य जनजागृतीचा प्रयत्न





आरंभ मराठी । मोहा

कळंब तालुक्यातील मोहा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बुधवार, दिनांक २८ मे रोजी ’टीबी मुक्त गाव’ या उपक्रमांतर्गत मोफत एक्स-रे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. आरोग्य विभागाच्या पुढाकाराने आणि गावकऱ्यांच्या सहकार्याने राबवलेल्या या उपक्रमास नागरिकांचा भरघोस प्रतिसाद लाभला. तब्बल ८० नागरिकांनी या मोफत सेवेचा लाभ घेतला. टीबी (क्षयरोग) प्रतिबंध आणि उपचाराच्या दृष्टीने एक्स-रे तपासणी हे एक महत्त्वाचे साधन आहे. ग्रामीण भागात टीबीचे वेळीच निदान व्हावे आणि लवकर उपचार सुरू व्हावेत, यासाठी ‘टीबी मुक्त गाव’ उपक्रमांतर्गत या तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये फुफ्फुसाचे विकार, छातीदुखी, दीर्घकाळ सर्दी-खोकल्याने त्रस्त असलेल्या नागरिकांची तपासणी करण्यात आली.या शिबिरात एक्सरे तंत्रज्ञ ज्ञानेश्वर जाधव यांनी अत्यंत कुशलतेने आणि नेटकेपणाने आपली भूमिका पार पाडली. तपासणीसाठी आलेल्या प्रत्येक नागरिकाची काळजीपूर्वक एक्स-रे चाचणी करताना त्यांनी अचूकतेवर भर दिला, त्यामुळे अनेक संशयित रुग्ण ओळखण्यात यश आले. शिबिराच्या यशात गतप्रवर्तक पूजा मडके यांच्यासह गावातील आशा कार्यकर्त्यांनी जनजागृतीसाठी मोठे योगदान दिले. त्यांनी घरोघरी जाऊन एक्स-रे तपासणीचे महत्त्व समजावून सांगितले व नागरिकांना शिबिरात सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. महिलांचा व वयोवृद्धांचा या शिबिरात विशेष सहभाग दिसून आला.शिबिराच्या यशस्वी आयोजनामध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ.सुमित मुंढे, औषध निर्माण अधिकारी शुभम कोंपलवार, आरोग्य सहाय्यक बाबुराव सुलाखे, आरोग्य सहाय्यिका श्रीमती जाधव, प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्रीमती मुळे, आरोग्य सेवक विशाल सदाफुले, संतोष फलफले, वाहन चालक अरुण मडके आणि अन्य आरोग्य कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य दिले.

# तुळजापूरमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त अभिवादन



आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापुरमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. प्रारंभी स्वातंत्र्यवीर सावरकर विचार मंचाच्या वतीने मान्यवरांचे स्वागत संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब शामराज, उमेश गवते, महेश गरड, महेश कुलकर्णी, शिवाजी बोधले यांनी केले. मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. सावरकर चौकातील नगरपरिषदेने बसवलेल्या नामफलकाचे देखील पूजन या निमित्ताने करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे, भाजपा तालुका अध्यक्ष आनंद कंदले, अमोल कुतवळ , बाळासाहेब शिंदे, शाम पवार, सुनील जाधव, नागेश नाईक, शिवाजी बोधले, सुहास साळुंके, जनहित संघटनेचे अध्यक्ष अजय साळुंके, धैर्यशील दरेकर, बालाजी तांबे, गणेश जळके, पत्रकार श्रीकांत कदम, अंबादास पोफळे, शुभम कदम, सुरज बागल, न्यानेश्वर गवळी, संजय खुरुद, गणेश जळके, विजय वाघमारे,संस्कार भारतीचे अध्यक्ष पद्माकर मोकाशे,सुधीर महामुनी, आण्णा शेटे, शांताराम पेंदे, संस्कार भारतीच्या अध्यक्ष सौ.अपर्णाताई शेटे,जनक पाटील, शहाजी जगदाळे,अनंत कोंडो, डॉ.सतिश महामुनी, नागनाथ भांजी, संतोष डोईफोडे, हरी पाठक, अविनाश तुळजापूरकर, अमित कदम,निलेश रोचकरी, दिपक तिकोने, काळे, गोपाळ चाटुफळे, रमेश खोपकर, बाळासाहेब भोसले,एड गिरीश लोहारेकर,सावरकर विचार मंच चे अध्यक्ष बाळासाहेब शामराज, सचिव महेश कुलकर्णी, उपाध्यक्ष उमेश गवते, कार्याध्यक्ष महेश गरड आदींची या निमित्ताने उपस्थिती होती.

www.arambhmarathi.com
दैनिक
आरंभ मराठी
आपलं धाराशिव....
गुरूवार दि.29 मे 2025

# महिला सशक्तीकरणासाठी कौशल्य प्रशिक्षण,प्रेरक सामाजिक संस्थेचा उपक्रम

## मोहा ग्रामपंचायतीचा ''एक दिवस गावकऱ्यांसोबत'' उपक्रम उत्साहात







आरंभ मराठी । मोहा

कळंब तालुक्यातील मोहा गावात बुधवारी (दि.२८) महिला सशक्तीकरणासाठी ग्रामपंचायत मोहा व प्रेरक सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शिवणकाम व फॅशन डिझायनिंग यांसारख्या कौशल्याधिष्ठित प्रशिक्षणाचा समारोप व प्रमाणपत्र वितरण सोहळा संपन्न झाला. यासोबतच ग्रामपंचायतीचा ''एक दिवस गावकऱ्यांसोबत'' हा विशेष उपक्रमही पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात करण्यात आले होते. कार्यक्रमात प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना सन्मानपूर्वक प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनवून त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला. महिलांना कौशल्याधारित रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ग्रामपंचायत आणि सामाजिक संस्था एकत्रितपणे प्रयत्नशील असल्याचे यावेळी बोलताना विविध मान्यवरांनी सांगितले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये मोहा गावच्या विद्यमान सरपंच सौ. सीमा संदीप मडके, उपसरपंच बशारत मोमीन यांच्यासह पाणीपुरवठा विभागचे उपअभियंता साळुंके, विस्तार अधिकारी हनुमंत झांबरे, पंचायत समिती कळंबचे विस्तार अधिकारी साळुंके, बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती बोराडे, अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती थोरात, पाणीपुरवठा विभाग अभियंता चक्रे, लघु पाटबंधारे विभागचे अच्युत जगताप, प्रेरक सामाजिक संस्था प्रशिक्षक श्रीमती भाग्यश्री घोडके, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुमित मुंढे, विस्तार अधिकारी (सांख्यिकी) गपाट, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान प्रतिनिधी ए. जे. बनसोडे, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती.मुळे तसेच विविध शासकीय विभागातील अधिकारी आणि सामाजिक संस्था प्रतिनिधींचा समावेश होता. कार्यक्रमात उपस्थित महिलांनी कौशल्य प्रशिक्षणानंतर आपले अनुभव व्यक्त केले. शिवणकाम व फॅशन डिझायनिंगसारख्या प्रशिक्षणातून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून घरबसल्या उत्पन्न मिळवता येणार असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या प्रशिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे त्यांनी सांगितले. ग्राम पंचायतीचा ''एक दिवस गावकऱ्यांसोबत'' या उपक्रमांतर्गत ग्रामपंचायतचे पदाधिकारी व विविध विभागांचे अधिकारी गावकऱ्यांच्या थेट संपर्कात राहून त्यांचे प्रश्न जाणून घेत होते. ग्रामपंचायत प्रशासन गावकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे यावेळी दिसून आले.

# धाराशिव जिल्ह्यात महसूल विभागातील बदल्यांमध्ये अनियमितता

## अमोल जाधव यांची चौकशीची मागणी

आरंभ मराठी । तुळजापूर

धाराशिव जिल्ह्यातील महसूल विभागामध्ये नुकत्याच पार पडलेल्या बदली प्रक्रियेमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप शिवसैनिक अमोल जाधव यांनी केला आहे. त्यांनी महसूल मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे तात्काळ चौकशीची मागणी केली आहे. अमोल जाधव यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मे २०२५ मध्ये झालेल्या बदली प्रक्रियेमध्ये काही कर्मचारी हे लिपीक वर्गीय पदावरून पदोन्नती मिळवूनही गेल्या १० वर्षांहून अधिक काळापासून एकाच मुख्यालयात महसूल सहाय्यक अथवा सहाय्यक महसूल अधिकारी या पदांवर कार्यरत आहेत. शासन नियमानुसार कोणताही कर्मचारी जास्तीत जास्त ६ वर्षेच एखाद्या मुख्यालयात कार्यरत राहू शकतो. मात्र, याठिकाणी नियमानाच सर्रास उल्लंघन झाल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, या बदल्यांच्या प्रक्रियेमध्ये ज्या कर्मचाऱ्यांची पदोन्नती झाली आहे. त्यांचा 'ओव्हरस्टे' गृहित न धरता त्यांना बदल्यांमधून वगळण्यात आले आहे. जरी पदोन्नती झाली असली तरी, कर्मचारी एकाच मुख्यालयात वर्षानुवर्षे कार्यरत असल्यास त्यांचा ओव्हरस्टे धरून त्यांची इतरत्र बदली होणे आवश्यक आहे. परंतु याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना चुकीची माहिती दिल्यामुळे त्यांच्या निकटवर्तीय कर्मचाऱ्यांना बदल्यांमधून सुट दिली गेल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तसेच महसूल विभागातील या संपूर्ण बदल्या प्रक्रियेची सखोल चौकशी करून ज्या कर्मचाऱ्यांनी १० वर्षांहून अधिक काळ एकाच मुख्यालयात ठाण मांडलेला आहे, त्यांची तात्काळ इतरत्र बदली करण्यात यावी. तसेच, चुकीची माहिती देणाऱ्या आणि बदल्या प्रक्रियेत अनियमितता घडवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

# पावसाने केळीच्या बागांमध्ये पाणी



आरंभ मराठी | जवळा

परांडा तालुक्यातील जवळा (नि.) मंडळामध्ये सर्वत्र अवकाळी मुसळधार पाऊस झाल्याने आता केळी बागेमध्ये पाणी साचले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. जवळा परिसरात ४० ते ५० हेक्टरवर केळी लागवड झालेली असून, अवकाळी पावसाने केळी उत्पादक शेतकऱ्यासह इतर शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.जवळा येथे बुधवारी दुपारी दोन-तीन-चारच्या सुमारास मुसळधार पाऊस पडल्यामुळे वादळी वाऱ्यांसह आलेल्या अवकाळी पावसाने उभ्या पिकाची नासाडी झाली. शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. येथील केळी उत्पादक शेतकरी चैतन्य रामेश्वर देशमुख यांच्या शेतातील अडीच एकरावरील केळीच्या बागेमध्ये पाणी साचले असून या अवकाळी तडाख्यामुळे मोठी झाडे उन्मळून पडली आहेत. जवळा परिसरातील काही भागात आंबा व केळीच्या बागेचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने बांधावर जाऊन तात्काळ पंचनामे करून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी होत आहे.

# सीना कोळेगाव धरणावर आपत्ती व्यवस्थापन पथकाची रंगीत तालीम

आरंभ मराठी । परंडा

दिनांक २७ मे रोजी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली डोमगाव ता. परंडा येथे सीना कोळेगाव धरण येथे आपत्ती व्यवस्थापन टीमची रंगीत तालीम (मॉक ड्रिल) घेण्यात आली. या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वैशाली तेलोरे, उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी गौरीप्रसाद हिरेमठ, तहसिलदार निलेश काकडे, तहसिलदार जयवंत काकडे, पोनि दिलीपकुमार परेकर पोलीस ठाणे परंडा, सपोनि गोरक्षनाथ खरड पोलीस ठाणे अंबी, सपोनि प्रविण सिरसट पोलीस ठाण परंडा, जिल्हा संधारण अधिकारी पी के महामुनी, गटविकास अधिकारी राउत, तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे, सहा. अभियंता आर बी माने डॉ.साचे यांच्या सह पोलीस विभाग, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# देवळाली येथील अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात समाप्ती

आरंभ मराठी । भूम



श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व सदगुरू शामनाथ महाराज यांच्या समाधी सोहळ्यानिमित्त मौजे देवळाली येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याचे किर्तनाची सांगता ह.प.भ धर्मराज दादा सामनगावकर यांच्या किर्तनाने झाली. या कार्यक्रमाला जिल्हाप्रमुख तथा दिशा समितीचे सदस्य रणजित ज्ञानेश्वर पाटील यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले. यावेळी ह.प.भ रामदास महाराज सामनगावर व ग्रामस्थांच्या वतीने दादांचा सत्कार करण्यात आला. जिल्हाप्रमुख रणजित ज्ञानेश्वर पाटील यांनी देवस्थानासाठी धाराशिव जिल्हाचे लोकप्रिय खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या स्थानिक खासदार निधीतून ७ लक्ष रूपये सभागृहासाठी निधी मंजुरीचे पत्र देण्यात आले. यावेळी तालुकाप्रमुख अनिल दादा शेंडगे, अजित तांबे , राहुल पाटील , चेतन कदम ,गुलाबराव गायकवाड ,सुनील तांबे ,विजयकुमार शेटे , भाऊराव गायकवाड, चेतन कदम , किशोर जगताप ,प्रशांत विधाते, निरंजन पाटील, धनराज तांबे , सुभाष बोराडे , लक्ष्मण लुंगारे ,आकाश महाराज जगताप ,रामदास खंदारे ,बळीराम जगताप, प्रतिक खंदारे,प्रफुल्ल आरगडे,दनंजय जठार,बालाजी माळी,बालाजी खंदारे,प्रमोद टिळक , बुध्दीवान लटके , बावची सरंपच नाना महाराज रोडगे व सर्व ग्रामस्थ मंडळी उपस्थीत होते.

# तुळजापूर विकासाच्या नकाशावर येणार,१८६५ कोटींच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला प्रशासकीय मान्यता

## शासन निर्णय निघाला,चालू आर्थिक वर्षापासून अंमलबजावणी

## मित्रचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव




अन्य तीर्थक्षेत्रांच्या तुलनेत विकासापासून दूर असलेल्या तीर्थक्षेत्र तुळजापूरच्या विकासाचा मार्ग आता प्रशस्त झाला आहे. कारण,सुमारे १८६५ कोटींच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास सरकारने मंजुरी दिली असून, यावर्षीपासूनच विकासाच्या कामांची सुरुवात केली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील विकास आराखड्याच्या अनुषंगाने नियोजन विभागाकडून प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय बुधवारी जारी करण्यात आला असल्याने चालू आर्थिक वर्षापासूनच त्याची अंमलबजावणीही सुरु होणार असल्याची माहिती 'मित्र'चे उपाध्यक्ष तथा श्री.तुळजाभवानी मंदिर संस्थानचे विश्वस्त आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये मुख्य दर्शन मंडप व तेथील अनुषंगिक सुविधा,श्री तुळजाभवानी माता छत्रपती शिवाजी महाराजांना तलवार देतानाचा १०८ फुटाचा पुतळा, घाटशिळ, महामार्गाजवळील सोलापूर बायपास पट्ट्यामध्ये व हडको येथे भक्तनिवास, प्रसादालय,पुस्तकालय, भोजनालय, भाविक सुविधा केंद्र,वाहनतळ तयार करणे.वृंदावन गार्डनप्रमाणे आधुनिक उद्यान, वृध्द व दिव्यांगासाठी लिफ्ट, ट्रॅव्हलेटर आदी बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. ६ मे रोजी चौंडी येथे पार पडलेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास अंतिम मान्यता देण्यात आली होती. जिल्हाधिकारी यांना संनियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. संपूर्ण प्रकल्प वेळेत आणि पारदर्शकपणे पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.



### जागतिक दर्जाचे पर्यटन विकसित करणार

तुळजापूर आणि परिसराचा कायापालट करण्याची क्षमता असलेल्या या महत्वपूर्ण प्रकल्पांतर्गत १०० कोटींपेक्षा अधिक किंमतीचा श्री. तुळजाभवानी माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा १०८ फूट उंचीचा पुतळा, ८० कोटींचा रामदरा तलाव सौंदर्यीकरण, ९८ कोटींचे बहुस्तरीय पार्किंग सुविधा केंद्र, तसेच हजारो चौ.मी. क्षेत्रात पायाभूत सुविधांचा समावेश असणार असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले आहे. तुळजाभवानी देवीजींचे तीर्थक्षेत्र जागतिक दर्जाचे पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याचा दृष्टीने या आराखड्यातील सर्व कामे पुढील तीन वर्षांत म्हणजेच २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच प्राचीन वास्तूंची ऐतिहासिकता अबाधित राखून पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखालीच ही सर्व कामे पार पाडण्यात येणार आहेत. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तुळजापूर हे राज्यातील एक महत्त्वाचे धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून अधिक प्रभावीपणे विकसित होणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

### भूसंपादनासाठी प्रचलित दरापेक्षा अधिक मावेजा



तुळजापूर शहरातील नागरिक आणि पुजारी बांधवांना विश्वासात घेऊन भूसंपादन प्रक्रिया राबवली जाणार आहे. प्रचलित दाराच्या कैकपटीने विकास आराखड्यासाठी जमिनीचे भूसंपादन केले जाणार आहे. त्यासाठी सादर करण्यात आलेल्या या विकास आराखड्यात ३०% तरतुद केवळ भूसंपादन प्रक्रियेसाठी करण्यात आली आहे. त्यामुळे ज्यांची जागा तीर्थक्षेत्र तुळजापूरच्या विकासासाठी संपादित केली जाणार आहे त्यांना समाधानकारक मावेजा मिळणार आहे. सर्वांच्या सहमतीने आणि सर्वांना विश्वासात घेऊन, जमिनीचा चांगला मोबदला देण्यात येणार असून आई तुळजाभवानी देवीजींचे तीर्थक्षेत्र जागतिक दर्जाचे करण्याचा आपला प्रयत्न आहे.

–राणाजगजितसिंह पाटील, आमदार तथा
विश्वस्त तुळजाभवानीमंदिर.

# तुळजापूर येथील सुरेख स्मृती रेस्ट हाऊस व सराया धर्मशाळा सुरु करण्याची मागणी



आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या आठवडा बाजार येथील सुरेख स्मृती रेस्ट हाऊस व कमान वेस येथील सराया धर्मशाळा भाविक पुजारी व नागरिकांसाठी सुरू करण्याची मागणी जाणता राजा युवा मंच वतीने मुख्याधिकारी नगरपरिषद तुळजापूर यांच्याकडे करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, तुळजापूर एक मोठे तीर्थक्षेत्र असल्याने येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी तुळजापुरात येत असतात. मात्र शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेले सराया धर्मशाळा व रेस्ट हाऊस हे काही काळापासून बंद असल्याने भाविक व स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तसेच ही धर्मशाळा व आठवडा बाजारातील रेस्ट हाऊस सुरू केल्यास स्थानिक पुजारी भाविक नागरिक यांच्यासाठी याचा मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. तरी सदर धर्मशाळा व सुरेख स्मृती रेस्ट हाऊस त्वरित सुरू करण्याची मागणी जाणता राजा युवा मंचच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी सुदर्शन वाघमारे ,अनमोल साळुंके ,सुमित साळुंके, शुभम खोले, कौस्तुभ जवळीकर, दत्ता बेंद्रे, शेखर साळुंके, शशिकांत मस्के, तानाजी साळुंके, विशाल साखरे, संकेत मस्के, नागेश किवडे, आदित्य खुराडे आदी उपस्थित होते.